भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाचा खर्च भागविण्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. आरपीए २०१७/प्र.क्र.४५/र-१
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १२ सप्टेंबर, २०१७

प्रस्तावना:

केंद्र शासनाने "भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ " हा नवीन अधिनियम भूसंपादन व पुनर्वसन यासाठी एकत्रितपणे पारित केला आहे. सदर अधिनियम दि.१.१.२०१४ पासून अंमलात आलेला असून या अधिनियमातील १०९ कलमान्वये शासनाने नियम तयार केले आहेत. सदर नियम दि.२७.८.२०१४ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. भूसंपादन "भूमीसंपादन व पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ५१च्या तरतूदीस अनुसरुन भूमी संपादनाच्या संबंधातील विवाद तातडीने निकालात काढण्याच्या प्रयोजनार्थ सर्व महसूल विभागासाठी एक भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाची स्थापना करण्यास व त्याकरिता नमूद करण्यात आल्यानुसार एकूण १३ पदे निर्माण करण्यास शासन निर्णय दिनांक २०.१२.२०१६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर नव्याने निर्माण करण्यात आलेल्या भूमीसंपादन, पुनर्वसन, व पुनर्स्थापना प्राधिकरणाचा खर्च भागविण्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणाचा खर्च भागविण्यासाठी खालीलप्रमाणे स्वंतत्र लेखाशिर्ष उघडण्यास शासन मान्यता देत आहे.

मराठी लेखाशिर्ष	इंग्रजी लेखाशिर्ष
महसूल व वन विभाग मागणी क्रमांक सी-५ प्रधान लेखाशिर्ष - २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण ०१ पुनर्वसन २०२ इतर पुनर्वसन योजना. (०३) प्रकल्प बाधित व्यक्तीची पुनर्वसाहत (०३) (०९) भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण संगणक संकेतांक क्रमांक २२३५C०६३	**Revenue & Forest Department** **Demand No C-05** **Major Head-2235-** **Social Secretary & Welfare,** **01 - Rehabilitation** **202 - Other Rehabilitation Scheme.** **(03) Resettlement of project affected persons.** **(03) (09) Land acquisition, Rehabilitation and Resettlement Authority.** **Computer Code No 2235C063.**

२. सदरहू शासन निर्णय महालेखापाल, महाराष्ट्र-१/नागपूर यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक TM/Gr.III / UOR ८/I/No-२८३, दि.४.७.२०१७ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २०२२/अर्थ-६, दिनांक ९.८.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१७०९१२१५१०२९६५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shivaji P Karwar

Digitally signed by Shivaji P Karwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46ec07554eac404147684ed8b27adc8a1c2a78fe8ffea3c9dd01377e25f76a36, cn=Shivaji P Karwar
Date: 2017.09.12 15:01:11 +05'30'

(शिवाजी पां. कारवार)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग.

प्रत:

१) मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२) मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३) मा. अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक
४) अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
५) महालेखापाल -२, (लेखा व अनुज्ञेयता)/लेखापरिक्षा, महाराष्ट्र, नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
७) वित्त विभाग (कार्यासन व्यय-१०/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई
८) विभागीय आयुक्त् कार्यालय, नागपूर
९) जिल्हाधिकारी, नागपूर
१०) उ.स .(कुलकर्णी) यांचे स्वीय सहायक
११) संचालक, कोषागरे, मुंबई
१२) कार्यासन ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
१३) र-१ कार्यासन निवडनस्ती.